# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

**Dr. Shyam Khandare**
**Director**
**Mo. No. - 7020482443**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/424 /2023** **Dt : 28/03/2023**

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :—२०२२—२०२३ या शैक्षणिक सत्राकरिता रासेयो अनुदान वितरण बाबत.**

महोदय/महोदया,

मा. कुलगुरु व अध्यक्ष, रासेयो गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे मान्यतेनुसार २०२२—२०२३ या शैक्षणिक सत्राकरिता आपल्या महाविद्यालयात रासेयो स्वंयसेवक संख्या आवंटित करण्यात आलेली आहे त्यानुसार अनुदान वितरण बाबत.

**अनुदान :—** राज्य संपर्क अधिकारी,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे निर्देशानुसार रासेयोचे कार्यक्रम राबविण्यासाठी वर्षातून दोन प्रभागात अनुदान निर्गमित करण्यात येईल.

**अ) नियमित कार्यक्रम —** नियमित कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रति विद्यार्थी प्रतिवर्ष रु. ३३५/— प्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे. या अनुदानाचे व्ययशीर्ष खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) कार्यक्रम अधिकाऱ्याचे मानधन | — | ६०/— |
| २) स्टेशनरी व कार्यालयीन खर्च | — | २५/— |
| ३) शिबीरपूर्व तयारी अल्पोपहार व कार्यनियोजन | — | १६०/— |
| ४) रासेयो संहितेनुसार साहित्य व सामग्री खरेदी | — | ३०/— |
| ५) विद्यार्थी/कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य प्रवासभत्ता | — | ३०/— |
| ६) इतर किरकोळ | — | ३०/— |
| | | **एकुण ३३५/—** |

**शुल्क :—** रासेयोमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून वार्षिक रु. १०/— नामांकन शुल्क घेण्यात येते. सदर शुल्क यावर्षीपासून विद्यापीठ रासेयो कक्षाकडे जमा करण्याची तरतूद करण्यात आली आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठ रासेयो कक्षाकडे प्रति विद्यार्थी प्रतिवर्ष रु. १०/— प्रमाणे राशी पाठविण्यापेक्षा आपल्या महाविद्यालयास अनुज्ञेय असणाऱ्या नियमित कार्यक्रमाच्या अनुदान राशीतून हा प्रभाग समायोजित करण्यात येईल. शासन निर्देशानूसार अनुदान दरात बदल होऊ शकतो.

**ब) विशेष शिबीर कार्यक्रम —** सात दिवसीय विशेष शिबीर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आपल्या महाविद्यालयास मंजूर करण्यात आलेल्या एकुण विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी रु. ७००/— प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

डॉ. श्याम खंडारे 28/03/23
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली